# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ४२० /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—१७/०७/२०१६.

**१) मोटार सायकलची चोरी. :—**

दिनांक १६/०७/२०१६ रोजी १३.३० ते १५.०० वा. दरम्यान फिर्यादी मोरेश्वर गोमाजी ढोले वय ४७ वर्ष, रा. आंधळगाव यांनी त्यांची हिरो होंडा कंपनीची काळया रंगाची मोटार सायकल क्र. एमएच ३६ जे ४१३१ कि. २०,०००/—रू. ची शेतशिवार नागठाणा गावाकडे जाणा—या डांबरी रोडच्या कडेला ठेवली होती. ती कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेली. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परतेकी पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**२) शेतातील काकण मातीची चोरी. :—**

दिनांक ०३/०२/०१६ रोजी ०७.०० वा. दरम्यान फिर्यादी जगन्नाथ भागवत पटले वय ६८ वर्ष, रा. तुमसर यांच्या वारपिंकेपार शेतातील काकण माती (गाडाची) त्यांना न विचारता चारही आरोपीतांनी पाच ते सहा ट्रॉली काकण माती कि. २५,०००/—रू. ची चोरून नेवुन फिर्यादिचे नुकसान केले. असे फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून व मा. पोलीस अधीक्षक सा. भंडारा व उपविभागीय पोलीस अधिकारी तुमसर यांचे संदर्भीय पत्राचे चौकशी वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३७९,३४ भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. मुंडले पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**३) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक १६/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा—यांवर ०४ केसस, तिन सिटर वाहनांवरती ०५ केसेस व इतर वाहनांवरती ७२ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करिता.

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.